# प्रकरण - 6

## निष्कर्ष आणि शिफारशी

## प्रकरण - 6 वे

## निष्कर्ष आणि शिफारशी

6.1) प्रास्ताविक.

6.2) निष्कर्ष.

6.3) शिफारशी.

6.4) शब्दसंग्रहाच्या अभ्यासाची उपयुक्तता.

6.5) शब्दसंपत्तीबद्दल पुढील संशोधनासाठी शिफारशी.

6.6) समारोप.

## प्रकरण - 6 वे

## निष्कर्ष आणि शिफारशी.

### 6.1) प्रास्ताविक.

मागील प्रकरणात आपण प्रस्तुत विषयाच्या संशोधनासाठी कोणत्या संशोधन पद्धतीचा उपयोग केला, सामग्री गोळा करण्यासाठी कोणती साधने वापरली, संशोधनाची आधारसामग्री कशी गोळा केली, त्यानंतर त्याचे विश्लेषण व वर्गीकरण कसे केले इत्यादी माहिती पाहिली.

प्रस्तुत प्रकरणात आधारसामग्रीचे विश्लेषण केल्यानंतर कोणते निष्कर्ष निघतात याची माहिती दिलेली आहे. त्याचप्रमाणे निष्कर्षावर आधारीत अशा शिफारशीही देण्यात आल्या आहेत. तसेच प्रस्तुत संशोधन करतांना अभ्यासकाला जाणवलेल्या व अशाप्रकारच्या संशोधनासाठी उपयुक्त ठरणा-या काही समस्यांचा पुढील संशोधनासाठी निर्देश केलेला आहे.

### 6.2) निष्कर्ष:-

1) प्रस्तुत संशोधनात विद्यार्थी कोणते शब्द वापरु शकतात अशाच शब्दसंग्रहाचा शोध घेण्यात आलेला आहे. जो शब्द विद्यार्थी स्वत: वापरु शकतो तो शब्द निश्चितच त्याला ओळखता येतो, कारण शब्दाच्या अर्थाचे आकलन झाल्याशिवाय त्याला त्या विशिष्ट शब्दाचा सम्यक वापर करता येणार नाही. प्रस्तुत संशोधनात विद्यार्थ्यांच्या निबंध लेखनातील उपयोजित शब्दसंग्रहाचाच विचार करण्यात आलेला आहे. त्यामुळे ही शब्दसंपत्ती मर्यादितच आहे. प्रस्तुत संशोधनात ही शब्दसंपत्ती एकूण 33,972 एवढी आढळून आली.

2) पाठ्यपुस्तकाव्यतिरिक्त विद्यार्थी दूरदर्शन, आकाशवाणी, बोलपट, वृत्तपत्रे, नियतकालिके अशा समूह संपर्क साधनांच्या सान्निध्यात असतो. त्यामुळे प्रत्यभिज्ञान शब्दसंपत्तीपेक्षा या शब्दसंपत्तीचा विद्यार्थ्यावर निश्चितच परिणाम होत असतो. अशाप्रकारचे काही शब्द उदा. प्रायोजित, मुलाखत, कार्यक्रम, व्यत्यय, वितरण यांचा विद्यार्थ्यांवर प्रभाव पडलेला आढळून येतो.

3) इयत्ता अकरावीच्या विद्यार्थ्यांनी वापरलेली एकूण उपयोजित शब्दसंपत्ती 33,972

एवढी आहे. ही शब्दसंपत्ती एकूण 150 निबंधांवरुन संशोधित केलेली आहे, यावरुन प्रत्येक विद्यार्थ्याने वापरलेली सरासरी उपयोजित शब्दसंपत्ती 226.48 एवढी आहे.

4) शब्दसंपत्तीबाबत मराठीमध्ये इतर संशोधकांनी केलेल्या संशोधन पाहणीत नाम व सर्वनाम या शब्दांचा सर्वात अधिक वापर केलेला आढळून येतो. परंतु प्रस्तुत संशोधनात क्रियापद या शब्दांचा वापर सर्वाधिक आढळतो. एकूण 10,242 क्रियापदांचे शब्द वापरलेले आहेत, त्यांचे एकूण शब्दसंपत्तीशी शेकडा प्रमाण 30.15 एवढे आहे.

सुरवातीला विद्यार्थी नाम, विशेषण इत्यादी शब्दांचे ज्ञान वाढविताना दिसतात परंतु ते जसजसे प्रौढ बनत जातील तसे क्रियावाचक शब्दांकडे त्यांचा ओढा अधिक असलेला दिसून येतो.

5) क्रियापदाच्या शब्दानंतर नामे व सर्वनामे यांचा अधिक वापर केलेला आढळतो. भाषा विकासात वस्तूची नामे व त्याबद्दल येणारी सर्वनामे वापरण्याची विद्यार्थ्यांची प्रवृत्ती प्राथमिक स्तरांपासून आढळून येते. प्रस्तुत संशोधनात नामे व सर्वनामे यांचे एकूण शब्दसंपत्तीशी शेकडा प्रमाण अनुक्रमे 26.62 व 16.41 एवढे आढळून आले.

6) क्रियाविशेषण व उभयान्वयी अव्ययांचा वापर जवळजवळ सारखाच आढळून आला. क्रियावाचक शब्दाचे व त्यांना जोडून घेणा-या अव्ययांचे शेकडा प्रमाण अनुक्रमे 5.82 व 5.62 एवढे आहे.

7) उद्गारवाचक शब्द किंवा केवलप्रयोगी अव्यय यांचा वापर सर्वात कमी दिसून आला. त्यांचे शेकडा प्रमाण 0.05 एवढे अत्यल्प आहे. भावनात्मक अभिव्यक्ती करतांना केवलप्रयोगी अव्ययाचा वापर करण्याऐवजी वर्णन करण्याची विद्यार्थ्यांची वृत्ती दिसते.

8) मराठी वर्णमालेच्या आद्याक्षराच्या क्रमानुसार उपयोजित शब्दसंपत्तीची पाहणी केली असतां स्वरांनी सुरुवात होणा-या शब्दांपेक्षा व्यंजनांनी सुरवात होणा-या शब्दांची संख्या अधिक आहे. याचे कारण मराठी वर्णमालेत स्वर 12 आहेत तर व्यंजनांची संख्या 36 आहे. प्रस्तुत संशोधनात स्वर व व्यंजनांनी सुरुवात होणा-या उपयोजित शब्दांचे शेकडा प्रमाण अनुक्रमे 16.05 व 83.95 एवढे आहे.

9) वर्णमालेचे नादस्वरुप पाहता ओष्ठ्य वर्णांनी सुरुवात होणा-या शब्दांचे प्रमाण सर्वात अधिक आढळले. एकूण शब्दसंपत्तीशी अशा शब्दांचे शेकडा प्रमाण 20.92 एवढे आहे. याचे कारण अशा प्रकारचे शब्द उच्चारावयास सहज सुलभ असतात. 'म्' या व्यंजनाने सुरुवात होणारे शब्द सर्वाधिक म्हणजे शेकडा 9.21 एवढे आहे.

10). उच्चारस्थानाप्रमाणे शब्दांचे प्रमाण पाहता प्रथम ओष्ठ्य वर्ण, त्यानंतर कंठ्य स्थान, तालव्य व सर्वात कमी मूर्धास्थानातील वर्णांनी सुरुवात होणारे शब्द असे प्रमाण आढळून येते. याचे शेकडा प्रमाण अनुक्रमे 20.92, 11.29, 6.28 व 1.07 असे आहे. यावरुन ज्या शब्दांचा उच्चार करायास सोपा आहे असे शब्द अधिक वापरात आहेत तर उच्चार करण्यांस जेवढे अधिक श्रम पडतात तेवढे ते शब्द कमी वापरण्याकडे विद्यार्थ्यांची प्रवृत्ती दिसते.

11) क्ष, ज्ञ या वर्णांनी सुरुवात होणारे शब्द अतिशय कमी आढळले. एकूण 33,972 शब्दांत असे फक्त 30 शब्दच आढळले. त्यांचे शेकडा प्रमाण 0.09 एवढे अत्यल्प आहे. याचे कारण या जोडाक्षरांचा उच्चार करण्यांस अधिक श्रम पडत असल्याने अशा प्रकारचे शब्द वापरामध्ये टाळण्याची विद्यार्थ्यांची प्रवृत्ती आढळून येते.

12) शब्दांच्या वारंवारितेनुसार उपयोजित शब्दसंपत्तीची पाहणी केली असता क्रियापदाच्या शब्दांची वारंवारिता सर्वाधिक आढळून आली. आत्मवाचक क्रियापदांचे प्रमाण जास्त दिसते. उदा. असणे, नसणे, करणे, देणे, घेणे अशासारख्या क्रियापद शब्दांची वारंवारिता सर्वात अधिक आढळते. याचे कारण वर्णनात्मक निबंधात एखादी क्रिया पूर्ण करण्याची विद्यार्थ्यांची प्रवृत्ती आढळते. या शब्दांची वारंवारिता 500 ते 1,000 एवढी आहे.

13) क्रियापदाच्या शब्दानंतर सर्वनामाच्या शब्दांची वारंवारिता जास्त आढळते. याचे कारण विद्यार्थी बरेचसे आत्मकेंद्रीवृत्तीचे असतात. 'मी' या सर्वनामाची वारंवारिता 1,007 एवढी आहे. त्याचबरोबर सोप्या शब्दांचा वापर करण्याची प्रवृत्ती असल्यामुळे नामांच्या ऐवजी सर्वनामांचा उल्लेख करणे सोपे जाते.

14) उपयोजित शब्दसंपत्तीमधील नामांच्या शब्दांची वारंवारिता 200 ते 300 च्या दरम्यान

अधिक आहे. नित्य, दैनंदिन परिचयातील वस्तूंची नामे विद्यार्थ्यांनी अधिक वापरलेली आहेत.

15) उपायोजित शब्दसंपत्तीचे विविध भाषेमधून आलेल्या व्युत्पत्तीनुसार वर्गीकरण पाहिले असता संस्कृत भाषेमधून आलेले तत्सम व तद्भव शब्द सर्वाधिक आहेत असे आढळून येते. याचे कारण मराठी भाषा ही संस्कृतोद्भव असल्यामुळे संस्कृत भाषेतून मराठीत रुढ होणा-या शब्दांचे प्रमाण अधिक आहे. एकूण शब्दसंपत्तीशी या शब्दांचे शेकडा प्रमाण 74.93 आहे. यावरुन संस्कृत भाषेतील शब्दांचा मोठा भरणा विद्यार्थ्यांच्या वापरात आहे असे दिसून येते.

16) संस्कृत खालोखाल उपयोजित शब्दसंग्रहामध्ये देशी शब्दांचा भरणा आहे. त्यानंतर इंग्रजी व हिंदी भाषिक शब्दांचा क्रम लागतो. त्यांचे शेकडा प्रमाण अनुक्रमे 13.26, 4.39 व 3.45 एवढे आहे. परकीय भाषेतून येणा-या शब्दात दूरदर्शन, आकाशवाणी, चित्रपट या प्रसार-माध्यमांचा विद्यार्थ्यांच्या शब्दसंपत्तीवर परिणाम झालेला आढळतो. सर्वात कमी कानडी शब्द आढळले. त्यांचे शेकडा प्रमाण 0.55 एवढे आहे.

17) मराठी भाषेत आतापर्यंत झालेल्या शब्दसंपत्तीच्या संशोधनात उपयोजित शब्दसंपत्तीबाबत इयत्ता 11वी च्या विद्यार्थ्यांची प्रस्तुत संशोधनात जी शब्दसंपत्ती आढळून येते ती तुलनात्मकदृष्ट्या कमी आहे. प्रत्येक विद्यार्थ्याने सरासरी 225 शब्द वापरले आहेत. याचाच अर्थ विद्यार्थ्यांची भाषिक क्षमता व अभिव्यक्ती कमी आहे.

वरील निष्कर्षातून आढावा काढल्यानंतर उपयोजित शब्दसंपत्ती सुधारण्याबाबत पुढील शिफारशी केल्या आहेत.

**6.3) शिफारशी:-**

प्रस्तुत शोध निबंधात उपयोजित शब्दसंपत्तीच्या संशोधनाची पाहणी केल्यानंतर असे निदर्शनास येते की, एकूण 33,972 उपयोजित शब्दांच्या वारंवारितेचा विचार करता विद्यार्थ्यांनी फक्त 1,628 शब्दांचाच वापर केलेला आहे. ही शब्दसंपत्ती इयत्ता 11वी च्या विद्यार्थ्यांच्या मानाने कमीच आहे. शब्दसंपत्ती सुधारल्या शिवाय विद्यार्थ्यांची आकलन शक्ती वाढणार नाही, त्याचप्रमाणे

त्यांची भाषिक अभिव्यतीही सार्थ होणार नाही. उपयोजित शब्दसंपत्तीच्या संग्रहात वाढ होण्याच्या दृष्टीने पुढील शिफारशी उपयुक्त आहेत.

1) सध्याच्या अभ्यासक्रमात प्रथमभाषा म्हणून मराठी विषयाला इयत्ता 11वी च्या वेळापत्रकात दिलेल्या 5 तासिका अपु-या वाटतात. वेळापत्रकांत मराठी विषयासाठी किमान 7 तासिका हव्यात.

2) इयत्ता 11वी व 12वी च्या परीक्षेत भाषा विषयांना गौण स्थान आहे. उत्तीर्ण होणा-या विद्यार्थ्यांच्या टक्केवारीस या विषयाचे गुण न धरण्याची जी मूल्यमापनाची पद्धती आहे ती सदोष आहे. त्यामुळे विद्यार्थी या विषयाचा काळजीपूर्वक अभ्यास करत नाही. सबब परीक्षा पद्धतीमधील ही गुणांकन करण्याची पद्धत रद्द करुन भाषा विषयाच्या गुणांचाही टक्केवारीत समावेश व्हावा.

3) मराठी विषयाच्या प्रश्नपत्रिकेचे स्वरुपही वस्तुनिष्ठ नाही. पाठ्यपुस्तकातील थोडी माहिती व व्याकरणाच्या भागावरील कांही स्थूल प्रश्न एवढ्याच बाबीचा अभ्यास केल्यास विद्यार्थी उत्तीर्ण होऊ शकतात. म्हणून प्रश्नपत्रिकेचे स्थूल स्वरुप बदलून मराठी भाषेच्या सर्व सांगोपांगाचा समावेश होईल अशा प्रश्नांचा समावेश व्हावा.

4) प्रस्तुत संशोधनानुसार उच्चाराप्रमाणे शब्द वापरण्याची विद्यार्थ्यांची प्रवृत्ती लक्षात घेता अभ्यासक्रमात प्रगट वाचनाला स्थान असणे महत्वाचे आहे. त्यादृष्टीने मौखिक चाचणीला महत्वाचे स्थान असावे. प्रचलित अभ्यासक्रमात मौखिक चाचणीला कोठेही स्थान नाही. म्हणून मौखिक परीक्षेचा अभ्यासक्रमात समावेश व्हावा.

5) स्पष्ट व शुद्ध शब्दोच्चारामुळे भाषिक अभिव्यक्ती वाढते तसेच पाठांतराने सुद्धा वाढते. पाठ्यपुस्तकाव्यतिरिक्त इतर पूरक वाचनाचा विद्यार्थ्यांमध्ये अभाव आढळून येतो. वाङ्.मयातील सुभाषिते, वचने, उत्तम वाङ्.मय उता-यांचा संग्रह अशा बाबींची त्रुटी आढळते. अभ्यासाबरोबर शालाबाह्य उपक्रमावरही भर द्यावा. पुस्तक परीक्षण, वक्तृत्व स्पर्धा, सुंदर हस्ताक्षर स्पर्धा, कथालेखन, काव्यलेखन अशा सारख्या स्पर्धा ठेवून सृजनात्मक अभिव्यक्तीला प्रोत्साहन मिळेल असे कार्यक्रम आयोजित करावेत.

6) लेखन कौशल्याचा विद्यार्थ्यांना कंटाळा वाटतो. यासाठी रसास्वादात्मक प्रश्नांचा समावेश असावा. एखाद्या कवितेचे रसग्रहण , दोन उता-यांचे वाङ्मयीन परीक्षण, अपठीत उता-यावरील प्रश्न अशा सारख्या भागावर भर द्यावा.

7) विद्यार्थ्यांमध्ये आकलनात्मक अर्थग्रहणशक्तीची कमतरता आढळते. याचे कारण शब्दांचे नेमके अर्थ त्यांना माहित नसतात. यासाठी संदर्भ वाचन, शब्दकोशांचा वापर इत्यादीसाठी आवश्यक असणारी पुस्तके विद्यार्थ्यांना उपलब्ध करुन द्यावीत. शब्दांचे पौराणिक, ऐतिहासिक संदर्भ कसे पहावेत, त्यासाठी कोणकोणत्या कोशांचा, पुस्तकांचा वापर करावा, ग्रंथालयीन साहित्याचा, सूचीचा कसा वापर करावा याची माहिती शिक्षकांनी विद्यार्थ्यांना द्यावी.

8) मराठीच्या अध्यापनात केवळ माहितीवर भर दिला जातो. नवीन शब्द परिचय, संदर्भानुसार बदलणा-या शब्दाच्या अर्थच्छटा यावर भर नसल्यामुळे विद्यार्थ्यांच्या नवीन शब्दांच्या संकल्पना अपूर्ण राहतात. यासाठी अध्यापनात शब्दस्पष्टीकरणावर अधिक भर द्यावा.

9) मराठीच्या पाठ्यपुस्तकात मूल्यमापनात्मक प्रश्न नसतात, त्यामुळे नेमक्या कोणत्या भागाचा अभ्यास करावयाचा याचा मानसिक गोंधळ विद्यार्थ्यांच्या मनात निर्माण होतो. यासाठी प्रत्येक धड्याच्या खाली स्वयंअध्ययनासाठी प्रश्नांची योजना असावी.

10) पाठ्यपुस्तकाच्या संपादकीय टिप्पणीमध्ये शब्दार्थ, आवश्यक त्या संदर्भाचे स्पष्टीकरण, पूरक वाचनासाठी संदर्भ सहित्य सूची यांचा समावेश असावा.

11) इयत्ता 11वी च्या मराठी विषयशिक्षकांसाठी मार्गदर्शपर हस्तपुस्तिका असाव्यात. त्यामध्ये महत्वाच्या शब्दांचे स्पष्टीकरण, कोणती शैक्षणिक साधने वापरावीत यांचे मार्गदर्शन, महत्वाच्या संदर्भाचा सारांश इत्यादी माहितीचा समावेश असावा. विशेषत: ग्रामीण विभागातील अध्यापकांना संदर्भ साहित्य उपलब्ध होईलच असे नाही. यासाठी या हस्तपुस्तिका उपयुक्त होतील.

12). शब्दसंग्रह वाढण्यासाठी पद्धतशीर अभ्यासाची जरुरी आहे. प्रत्यभिज्ञान शब्दसंपत्तीमधील शब्दसंग्रह व्यवहारात उपयोगात आला की त्याचे उपयोजित शब्दसंग्रहामध्ये

रुपांतर होते. यासाठी पाठ्यपुस्तकांचा बारकाईने अभ्यास झाला पाहिजे. त्याचे वस्तूनिष्ठ मूल्यमापन होण्यासाठी समानार्थी शब्द द्या, विरुद्धार्थी शब्द सांगा, शब्दांच्या योग्य जोड्या तयार करा, रिकाम्या जागी योग्य शब्द लिहा अशा सारख्या वस्तूनिष्ठ प्रश्नाचा जास्तीत जास्त वापर करावा.

## 6.4) शब्दसंग्रहाच्या अभ्यासाची उपयुक्तता:-

पुढारलेल्या देशांमध्ये भाषा विकासात शब्दसंग्रहाच्या संशोधनाला फार मूलभूत महत्व देण्यात आलेले आहे. शब्दसंग्रहाच्या अभ्यासाने विद्यार्थ्यांच्या अर्थग्रहण क्षमतेमध्ये वाढ होऊन आकलनात्मक शक्ती तर वाढतेच परंतु यथोचित शब्दांच्या वापरामुळे आपले विचार परिणामकारक भाषेत मांडून त्याला योग्य अभिव्यक्तीही करता येते. याशिवाय शब्दसंग्रहाच्या अभ्यासाची उपयुक्तता पुढील बाबीतही आढळते.

1)पाठ्यपुस्तकांची योग्य रचना करण्याबाबत शब्दसंग्रहाचा अभ्यास उपयोगी पडतो.

2) व्यवहारात व्यक्तीच्या अंगी संभाषणचातुर्य शब्दसंग्रहाच्या अभ्यासाने वाढते.

3) लेखक, साहित्यिक यांना साहित्याची परिणामकारक अभिव्यक्ती साधण्यासाठी शब्दसंग्रहाची आवश्यकता असते.

4) अध्यापनात योग्य स्पष्टीकरण, आशय अभिव्यक्ती, कथन, वर्णन, व्याख्यान यासाठी शब्दसंग्रहाचा अभ्यास उपयोगी पडतो.

5) बुध्दीमापन कसोट्यांमध्ये भाषिक क्षमतेचा विकास साधण्यासाठी शब्दसंग्रहाच्या अभ्यासाची जरुरी असते.

6) दूरदर्शन, आकाशवाणी कार्यक्रम यांच्या परिणामकारकतेसाठी यथोचित शब्दसंग्रहाची जरुरी असते.

7) नाट्यीकरण, संभाषण, मुलाखत इत्यादींसाठी भावनांचे योग्य प्रकटीकरण व्हावे यासाठी परिणामकारक शब्दसंग्रहाची जरुरी असते.

8) जाहिरात, प्रचार साधने यासाठी समर्पक शब्दयोजना करुन थोड्या शब्दात आवश्यक परिणाम साधावयाचा असतो. त्यासाठी शब्दसंग्रहाची उत्तम जाण असावी लागते.

9) बालवाङ्मय, प्रौढ साक्षरांसाठी लागणारे वाङ्मय यामध्ये परिचित अशा उपयोजित शब्दसंपत्तीचा उपयोग केलेला असेल तर या वाङ्मयाची उपयुक्तता व विश्वास वाढतो. अशासाठी शब्दसंग्रहाचा अभ्यास उपयुक्त ठरतो.

10) वर्गात अध्यापन करतांना प्रत्येक विद्यार्थ्याचा वैयक्तिक शब्दसंग्रह लक्षात घेणे कठिण असते. तसेच प्रत्येक विद्यार्थ्याला सर्व शब्द समजावून सांगणे अशक्य असते. अशावेळी विविध शब्दकोशांची मदत घ्यावी लागते. या शब्दकोशांची इयत्तावार रचना करणे शब्दसंपत्तीच्या अभ्यासाने सोपे जाते.

11) परीक्षेत प्रश्नपत्रिका काढताना शिक्षकांना विद्यार्थ्यांची शब्दसंपत्ती माहित असणे आवश्यक असते. पुष्कळवेळा विद्यार्थ्यांना उत्तर येत असूनही प्रश्नातील शब्दाचा अर्थ न कळाल्याने उत्तर लिहिता येत नाही. यासाठी परीक्षकाला विद्यार्थ्यांची उपयोजित शब्दसंपत्ती माहित असणे आवश्यक आहे. त्याशिवाय योग्य मूल्यमापन करणारी प्रश्नपत्रिका काढता येणार नाही.

## 6.5) शब्दसंपत्तीबद्दल पुढील संशोधनासाठी शिफारशी:-

प्रस्तुत संशोधनात इयत्ता अकरावीच्या उपयोजित शब्दसंपत्तीचाच अभ्यास करण्यात आलेला आहे. त्यासाठी कराड शहरातील कला शाखेच्या विद्यार्थ्यांच्या निबंधलेखनाद्वारे प्रकट होणा-या उपयोजित शब्दसंपत्तीचा विचार केलेला आहे. प्रस्तुत संशोधनाच्या व्याप्तीचा व मर्यादेचा विचार करुन शब्दसंपत्तीविषयक संशोधनासाठी काही समस्यांचा पुढे निर्देश करण्यात आला आहे.

1) उपयोजित शब्दसंपत्तीचा अभ्यास करतांना लिखित पद्धतीबरोबर मौखिक पद्धतीचा विचार करणे आवश्यक आहे. बोलण्यातून भाषिक आविष्कार नैसर्गिकपणे व्यक्त होतो, तसा तो लेखनातून होत नाही. त्याचप्रमाणे लिखित पद्धतीमध्ये स्वाध्याय, उत्तरपत्रिका, पत्रलेखन, ट्यूटोरियल्स इत्यादींचाही समावेश असावा म्हणून मौखिक व लिखित पद्धतीचा समावेश असणारे संशोधन व्हावे.

2) प्रस्तुत संशोधनात इयत्ता 11वी च्या कलाशाखेतील विद्यार्थ्यांच्या उपयोजित

शब्दसंपत्तीची पाहणी केलेली आहे. त्याचबरोबर विज्ञान, वाणिज्य या शाखेच्या विद्यार्थ्यांच्या शब्दसंपत्तीची पाहणी तुलनात्मक होणे संशोधनाच्या दृष्टीने आवश्यक आहे.

3) प्रस्तुत शब्दसंग्रहाची पाहणी फक्त कराड शहरातील विद्यार्थ्यांपुरती मर्यादित आहे. त्यामुळे मराठी भाषेमध्ये असणाऱ्या प्रादेशिक बोली भाषांचा त्यात समावेश होत नाही. यासाठी महाराष्ट्रीमधील भौगोलिक दृष्ट्या विविधता असणारे प्रदेश व बोली उदा. कोकणी, वऱ्हाडी, खानदेशी इत्यादी भागातील विद्यार्थ्यांच्या शब्दसंग्रहाची पाहणी असणारे संशोधन अभ्यासकांना उपयुक्त होईल.

4) प्रस्तुत संशोधनात इयत्ता 11वी च्या विद्यार्थ्यांची उपयोजित शब्दसंपत्तीचीच पाहणी करण्यात आलेली आहे. शब्दसंग्रहाच्या परिपूर्णतेसाठी प्रत्यभिज्ञान शब्दसंपत्तीची पाहणी करणारे संशोधन आवश्यक आहे. त्यामुळे दोन्ही प्रकारच्या शब्दसंग्रहाची तुलना करणे शक्य होईल.

5) मराठी भाषेतील शब्दसंग्रहाच्या संशोधनाबाबत आतापर्यंत इयत्ता 7वी अखेर प्रत्यभिज्ञान व उपयोजित शब्दसंपत्तीबाबत संशोधन झालेले आहे. इयत्ता 8वी पासून पुढे शब्दसंपत्तीच्या अभ्यासाचे संशोधन होणे आवश्यक आहे. त्याशिवाय कोणत्या इयत्तेमध्ये कोणत्या नवीन शब्दसंग्रहाची भर पडली ते सांगणे कठिण आहे.

## 6.6) समारोपः-

भाषेच्या अभ्यासामध्ये शब्दसंपत्तीचा अभ्यास हा महत्त्वाचा आहे. अशा प्रकारच्या अभ्यासाने भाषेच्या विकासाला हातभार लागतो. परंतु अशा प्रकारचे संशोधन करणे अतिशय किचकट आणि कंटाळवाणे काम आहे.

आपल्याकडे अनेक लोकांना शब्दसंपत्तीच्या अभ्यासाचे महत्व अद्याप कळलेले नाही. त्यामुळे हा विषय अत्यंत उपयुक्त असूनही बहुसंख्य अभ्यासक त्याबाबत उदासीनच आढळतात. त्याचप्रमाणे या प्रकारच्या संशोधनाच्या अभ्यासाला जी साधनसामग्री व संदर्भ साहित्य लागते त्याचा मराठी भाषेत अभाव आढळून येतो. इंग्रजीमध्ये भरपूर भाषिक क्षमता कसोट्या आहेत. परंतु

मराठी भाषेत अशा फारच थोड्या कसोट्या आढळतात.

या संशोधनाच्या बाबत येणारी दुसरी प्रमुख अडचण म्हणजे शब्दसंग्रहाची अफाट यादी होय. त्याची वर्गवारी करणे, वारंवारिता काढणे या बाबी कंटाळवाण्या, त्याचबरोबर वेळखाऊ असतात. इंग्रजी भाषेत अशा संशोधनाबाबत अलिकडे संगणकाचा फार प्रभावी वापर होऊ लागला आहे. त्यामुळे कमी वेळेत उपयुक्त संशोधन करता येते. मराठी भाषेबाबत संगणकावर देवनागरी लिपीचा वापर अद्याप प्रायोगिक अवस्थेत असल्यामुळे संगणकाचा उपयोग होऊ शकत नाही. परंतु नजीकच्या काळात हा उपयोग करणे शक्य असल्यामुळे शब्दसंपत्तीच्या संशोधनात मराठी साहित्यात मोलाची भर पडेल अशी आशा वाटते.